टिपणी-

वाचले - १. श्रीमती निर्मला शिवाजी येवले तर्फे कु.मु. युवराज गणपतराव वाघ, रा. ओझर्डे, ता. वाई, जि. सातारा व श्री. विजयसिंह जयसिंगराव पिसाळ यांचा दिनांक १४/११/२०१८ रोजीचा अर्ज

२. सहाय्यक संचालक, नगर रचना, सातारा यांचेकडील पत्र जा.क्र. पुर्णत्वाचा दाखला/ मौ.वनवासवाडी खेड/ता. सातारा/स.नं.१/२ व १/३ब/ससंसा/२४९ दिनांक १५/०१/२०१८

३. इकडील आदशे क्र. मह/३/जमीन/बि.शे./एसआर-२०१ दिनांक १२/०८/१९८८

४. इकडील आदशे क्र. मह/३/जमीन/बी.पी./एसआर-१०/१५ दिनांक २६/११/२०१५

५. इकडील आदशे क्र. मह/३/जमीन/बी.पी./एसआर-१०/१७ दिनांक २९/१०/२०१८

६. सहाय्यक संचालक, नगर रचना, सातारा यांचेकडील पत्र जा.क्र. पुर्णत्वाचा दाखला/ मौ.वनवासवाडी खेड/ता. सातारा/स.नं.१/२ व १/३ब/ससंसा/४९५ दिनांक १२/०२/२०१९

---

जिल्हाधिकारी जिल्हा सातारा

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्र.मह/३/जमीन/बां.पु./एसआर-३६/१८
सातारा, दिनांक- १४/०२/२०१९

## बांधकाम पुर्णत्वाचा दाखला

प्रमाणित करण्यात येते की, मौजे वनवासवाडी, ता. सातारा येथील स.नं. १/२, क्षेत्र ४०० चौ.मी. व १/३ब, क्षेत्र ३०० चौ.मी. असे एकूण क्षेत्र ७०० चौ.मी. मिळकतीस मधील मिळकतीस इकडील आदेश क्र.मह/३/जमीन /बिशे/एसआर-२०१, दिनांक-१२/०८/१९८८ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बिनशेती परवानगी देणेत आलेली आहे. तसेच आदेश क्र. मह/३/जमीन/बी.पी./एसआर-१०/१५ दिनांक २६/११/२०१५ अन्वये बांधकाम परवानगी व आदेश क्र. मह/३/जमीन/बी.पी./एसआर-१०/१७ दिनांक २९/१०/२०१५८ सुधारीत बांधकाम परवानगी देणेस आली आहे.

सदर भुखंडामधील इमारतींचे बांधकामाची सहाय्यक संचालक, नगर रचना, सातारा यांनी पाहणी केली असता सदरहू बांधकाम सर्वसाधारणपणे मंजूर नकाशाप्रमाणे व बांधकाम नियमावलीनुसार असल्याने व संबंधित अटी व शर्तीची पूर्तता केलेने सदर इमारतीचा रहिवास कारणासाठी वापर करणेस अटी व तपशिलानुसार भोगवटा प्रमाणपत्र देणेस हरकत नसलेबाबत कळविले आहे. मंजूर नकाशानुसार मजलेनिहाय बांधकाम क्षेत्र, सदनिकांची संख्या याबाबतचे विवरण पुढीलप्रमाणे आहे. तरी सदर इमारतीचा रहिवास प्रयोजनासाठी वापर करण्यास खालील अटी व शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

| मजला | अनुज्ञेय वापर | क्षेत्र चौ.मी. | सदनिकांची संख्या |
|---|---|---|---|
| स्टील्ट मजला | रहिवास | २१६.११ | ०५ |
| पहिला मजला | | २१६.११ | ०५ |
| दुसरा मजला | | २१६.११ | ०५ |
| तीसरा मजला | | १८०.६४ | ०५ |
| जादा बाल्कनी | | ७.८० | -- |
| एकूण क्षेत्रफळ | | ८३६.७७ | २० |

१. मंजूर नकाशा व्यतिरिक्त तसेच बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेतल्यानंतर केलेले बांधकाम अनाधिकृत समजून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनिमय कलम ५२ ते ५६ नुसार विना नोटीस फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.

२. भोगवटा प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या नकाशात (Record plan) लाल रंगाने दाखविल्याप्रमाणे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात येत आहे.

३. सदर रहिवास संकुलाच्या अनुषंगाने रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीमची तरतुद करणे बंधकारक राहिल.

४. या कार्यालयातील पुर्व परवानगी घेतल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र घेतलेल्या इमारीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे अंतर्गत व बाह्य बदल करुन नयेत.

५. मंजूर इमारत आराखड्यामध्ये नमूद केलेल्या कारणासाठीच इमारतींचा वापर करणेत यांवा. अन्य वापरासाठी इमारत वापरात असलेचे निदर्शनास आलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

६. मंजूर नकाशा व्यतिरिक्त जादा बांधकाम केलेचे आढळून आलेस योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल. केलेल्या बांधकामाचा दर्जा निकृष्ठ असलेस व एखादी दुर्घटना घडलेस त्यांची जबाबदारी प्राधिकरणाची राहणार नाही.

७. सांडपाण्याची व ड्रेनेजची व्यवस्था योग्य रितीने होत नसल्यास त्याबाबत तक्रारी आल्यास ती दुरुस्त करणेची जबाबदारी अर्जदारावर राहिल व न केलेस इमारत वापर प्रमाणपत्र रद्द करणेत येईल.

८. वरील अटींचा भंग केलेस व तसे निदर्शनास आलेस सदरहू बांधकाम पुर्णत्वाचा दाखला रद्द करणेत येईल.

स्थळप्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो.
यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी सातारा (शिक्का)

सही/-
**जिल्हाधिकारी सातारा**

**प्रति**,

श्रीमती निर्मला शिवाजी येवले तर्फे कु.मु. युवराज गणपतराव वाघ, रा. ओझर्डे, ता. वाई,जि. सातारा
व श्री. विजयसिंह जयसिंगराव पिसाळ,रा. सातारा ता. जि. सातारा

**प्रत** :- सहाय्यक संचालक, नगर रचना सातारा यांचेकडे जरुर त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

स्थळप्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो.
यांची स्वक्षारी असे

**निवासी उपजिल्हाधिकारी**
**सातारा**